# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार-अ

वर्ष १, अंक ६५]  गुरुवार, ऑक्टोबर २९, २००९/कार्तिक ७, शके १९३१  [पृष्ठे ५

किंमत : रुपये १८.००

असाधारण क्रमांक १३६


**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## विधी व न्याय विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ ऑक्टोबर २००९

### अधिसूचना

**भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२.**

क्रमांक आयपीए. २३०६/१/(२/०६)/का. पंधरा.—मारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ (१९३२ चा ९) याच्या कलम ७१ च्या पोट-कलमे (१) व (२) अन्वये, महाराष्ट्र भागीदारी नियम, १९८९ याच्या नियम १९ च्या संबंधातील यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन, उक्त अधिनियमाच्या कलम ७१ च्या पोट-कलम (३) द्वारे, आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे, उक्त नियमांमध्ये सुधारणा करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र भागीदारी (सुधारणा) नियम, २००९ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र भागीदारी नियम, १९८९ याच्या नियम १९ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :–

" १९. **कागदपत्रांच्या किंवा अधिनियमाच्या संबंधात देय असलेली फी.**–कागदपत्रांच्या किंवा अधिनियमाच्या संबंधात भागीदारी संस्थेच्या निबंधकाकडे भरावयाची फी पुढीलप्रमाणे असेल :—

| | | |
|---|---|---|
| (१) | कलम ५८ (१) खालील विवरणपत्र .. .. .. | सातशे रुपये |
| (२) | कलम ५८ (४) खालील अपीलाचे ज्ञापन .. .. .. | पाचशे रुपये |
| (३) | कलम ६० खालील विवरणपत्र .. .. .. | तीनशे रुपये |
| (४) | कलम ६१ खालील सूचना .. .. .. | तीनशे रुपये |
| (५) | कलम ६२ खालील सूचना .. .. .. | तीनशे रुपये |
| (६) | नोटीस कलम ६३ (१) खालील नोटीस .. .. .. | तीनशे रुपये |
| (७) | कलम ६३ (१-अ) खालील सूचना .. .. .. | तीनशे रुपये |
| (८) | कलम ६३ (२) खालील नोटीशी .. .. .. | तीनशे रुपये |
| (९) | कलम ६४ (२) खालील अर्ज .. .. .. | तीनशे रुपये |
| (१०) | भागीदारी संस्थांच्या नोंदवहीच्या एका खंडाच्या तपासणीसाठी कलम ६६ च्या पोट-कलम (१) अन्वये भागीदारी संस्थेच्या नोंदवहीची तपासणी | पन्नास रुपये |
| (११) | एका भागीदारी संस्थेच्या संबंधातील सर्व कागदपत्रांच्या तपासणीसाठी कलम ६६ च्या पोट-कलम (२) अन्वये एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधातील कागदपत्रांची तपासणी .. .. .. | पन्नास रुपये |
| (१२) | प्रत्येक १०० शब्दांसाठी किंवा त्याच्या भागासाठी कलम ६७ अन्वये नोंद वहीतील प्रती .. .. .. | पन्नास रुपये |
| (१३) | नियमांन्वये विहीत केलेल्या नमुन्यांची किंमत .. .. | पंधरा रुपये ". |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. बी. पटले,**
शासनाचे सॉलिसिटर-नि-सहसचिव.